# भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई

-: प्रेस नोट :- दिनांक २४/१०/२०२४

## २९ वर्षापासुन फरार आरोपी व २५ वर्षापासुन पाहिजे आरोपी यास अटक केलेबाबत

अतिरिक्त सत्र न्यायाधिश,शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय, न्यायालय क्र २२ बृहन्मुंबई.याचेकडुन जा.क्र ३१७०२/२२ दिनांक २७/१२/२०२२ अन्वये भोईवाडा पोलीस ठाणे गु.र.क्र.२९६/१९९५ क.३०७ भादवि मध्ये स्थायी अजामिनपात्र वॉरंट प्राप्त झाले होते.

सदर स्थायी अजामीनपात्र वॉरंट हे आरोपी नामे मोहम्मद रफिक उर्फ बाबा अब्दुल सत्तार शेख (गुन्हा घडलेल्या वेळी दिलेला पत्ता) राठी. रूम नं. १३ , १ ला माळा,अशियाना बिल्डींग आदम मिस्त्री लेन परेल मुंबई १२ याचे नावे प्राप्त झाले.

सदरचे वॉरंट हे बजावणीकरीता भोईवाडा पोलीस ठाणेस वर्ग करण्यात आले.नमूद आरोपी हा या गुन्ह्यात फरारी असल्याने तसेच तो भोईवाडा पोलीस ठाणे गु.र.क्र ३५/१९९८ कलम ३४२,३९४,३२६,३४ भादवि या गुन्हयामध्ये पाहिजे आरोपी असल्याने त्याचा शोध घेणेकामी एक विशेष पथक तयार करण्यात आले.

सदर पथकाने नमूद आरोपीचा शोध घेण्याकरीता सर्वप्रथम जुनी कागदपत्रे प्राप्त करून त्याचे अवलोकन केले तसेच त्यामध्ये नमूद असणारे त्याचे मित्र व नातेवाईक यांची माहिति प्राप्त केली.माहिती प्राप्त करत असतानाच सदरचा आरोपी हा काही काळ ओरिसा राज्य तसेच काही काळ जम्मू कश्मीर येथे वास्तव्यास असल्याचे कळून आले .अधिक माहिती घेतली असता सदरचा आरोपी हा मुंबईत देखील येवून सर जे.जे मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील चोर बाजार येथून जुन्या दुर्मिळ वस्तू, तसेच झुंबर विकत घेवून ते इतरत्र राज्यात जावून विकत असल्याची माहिती मिळाली त्यामध्येच नमूद पथकास आज दिनांक २४/१०/२०२४ रोजी खात्रीलायक सुत्रांकडून अशी माहिती मिळाली की,नमूद आरोपी हा त्याचे नातेवाईकांना भेटण्याकरीता ॲन्टॉप हिल येथे येणार आहे . त्याप्रमाणे नमूद पोलीस पथकाने तेथे पाळत ठेवून सदर आरोपीताशी मिळता जुळता वर्णणाचा इसम मिळून आल्याने त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचेकडे चौकशी केली असता तो आरोपी हा मोहम्मद रफिक उर्फ बाबा असल्याची खात्री झाल्याने वरीष्ठांना अवगत करून त्यास फेरअटक करण्यात आले.

आरोपीचा नाव व पत्ता -

मोहम्मद रफिक उर्फ बाबा अब्दुल सत्तार शेख वय ६३ वर्षे,सध्याचा पत्ता - रूम नं.४३०,७/सी, ४ था माळा म्हाडा वसाहत शेख मिस्त्री दर्गा स्टीट रोड ॲन्टॉन हिल मुंबई ३७.

आरोपीचा सहभाग असलेल्या गुन्हयांची माहिती -

१)भोईवाडा पोलीस ठाणे, गु.र.क्र.२९६/१९९५ क.३०७ भादवि यामध्ये फरारी आहे.

२) भोईवाडा पोलीस ठाणे ,गु र क्र ३५/१९९८ क.३४२,३९४,३२६,३४ भादवि मध्ये पाहीजे आरोपी आहे.

सदरची कामगीरी मा. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग श्री. अनिल पारसकर,मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, श्रीमती रागसुधा आर, मा. सहायक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग श्रीमती कुमुद कदम, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाईवाडा पोलीस ठाणे श्री. सचिन कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (का व सु) श्री. सोपान भाईक ,पोलीस उप निरीक्षक माधुरी पाटील, पोलीस उप निरीक्षक मधुकर पवार, पो.ह. ०१२१२/चव्हाण, पो.ह. ०११२७/म्हात्रे यांनी पार पाडली आहे.